



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाळ. वा.
दा. क्र. ५४३०
IRBK-0105439
IRBK-0105439

संस्कृत
साहित्य
सरिता
:२७

भास-कृत

# अभिषेक

अनुक्रम 20669
विभाग
क्रमांक
नों. दि. २४।९।५४

कथासार
अमरेन्द्र



नों. दि.
वा. क्र. ५४३८
IRBK-0105439
IRBK-0105439

वोरा ॲन्ड कंपनी, पब्लिश

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अँन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ति : १९५६
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २

# संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. 'संस्कृत-साहित्य-सरिता' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्हीं असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

—प्रकाशक

# परिचय

हा रामायणांतला प्रसंग आहे. भासाच्या तेरा नाटकां-पैकीं रामायणावरील जीं दोन नाटकें आहेत त्यांतील 'प्रतिमा' हें एक आणि 'अभिषेक' हें दुसरें. पैकीं 'प्रतिमा' म्हणजे शांतरसाचा निर्मळ प्रवाह. याचा या मालेंतून पूर्वीच परिचय करून देण्यांत आलेला आहे. दुसरें 'अभिषेक'; याला वीररसाचा विशेष उठाव आहे. 'अभिषेका'चें कथानक मूळ वाल्मीकि रामायणांतीलच असून त्यांत भासानें आपल्या इतर नाटकांप्रमाणें फारसा फेरफार केलेला नाहीं. 'प्रतिमा' नाटकांत प्रतिमांचा उपयोग त्यानें केला तो स्वतःच्या कल्पनेंतून. परंतु तसलाहि कांहीं कल्पनेचा विलास यांत नाहीं.

भवभूतीच्या 'महावीरचरिता'शीं याची तुलना करा-वीशी वाटते. कथानकाच्या दृष्टीनें दोन्ही रामायणांतील असलीं तरी 'अभिषेका'पेक्षां 'महावीरचरित' कितीतरी सरस वाटतें. तथापि भासाच्या भाषेंतील सुबोधता आणि सौन्दर्य यांतहि आहेत.

वनवासांत असतांना रामाची, सुग्रीवाशीं भेट झाली व रामानें वालीचा वध केला येथपासून रावणवधानंतर रामाला राज्याभिषेक झाला येथपर्यंतचा कथाभाग या नाटकांत आला आहे.

—लेखक

२०९७१
वाडेवाडी
७२९
२५।२।७४

# अभिषेक

सीता पळविली गेल्यामुळें रामाला अतिशय दुःखहि झालें होतें आणि भयंकर संतापहि आला होता. अस्वलांचा राजा सुग्रीव याचीहि तीच अवस्था झाली होती. त्याचा भाऊ वानरराज वाली यानें सुग्रीवाची बायको हिरावून घेतली होती आणि त्याचें राज्य बळकावून त्याला देशोधडीला लावलें होतें. असे ते दोघेहि समदुःखी असल्यामुळें परस्परांनीं परस्परांना साहाय्य करून दुःख निवारण करण्याचीं वचनें दिलीं. त्याप्रमाणें प्रथम रामानें वालीचा वध करण्याची कामगिरी अंगावर घेतली आणि त्यासाठीं सुग्रीव, हनुमान व लक्ष्मण यांच्यासह तो किष्किंधेकडे निघाला.

राम सुग्रीवाला आश्वासन देऊन म्हणत होता, "तूं मुळींच घाबरूं नकोस. आजच माझ्या बाणानें मी तुझ्या शत्रूचा देह छिन्नविच्छिन्न करून रणांगणावर फेंकून देईन. मी जवळ असतांना तुला घाबरण्याचें कारण नाहीं. वाली समरांगणांत मरून पडलेला आहे असेंच तूं आतां पाहाशील."

रामाच्या पराक्रमाविषयीं सुग्रीवालाहि विश्वास होता. त्यामुळें तो म्हणाला कीं, आपली कृपा असली म्हणजे वानरांचेंच काय पण देवांचेंहि राज्य हस्तगत करण्याची अपेक्षा मी करूं शकतों. सुग्रीवाच्या या बोलण्यामुळें हनुमंतालाहि धीर आला. त्यानें वानरांच्या विजयाची अपेक्षा करीत रामाला किष्किंधेचा मार्ग दाखविला.

लवकरच ते सर्वजण किष्किंधेजवळ येऊन पोहोंचले. तेथें वाली तिच्या रक्षणासाठीं सज्ज होता. सुग्रीवानें रामाची संमति घेतली व किष्किंधा नगरीच्या बाहेरूनच मोठ्यानें गर्जना करून वालीला युद्धासाठीं आव्हान केलें.

पूर्वी पराभूत झालेला सुग्रीव ज्याअर्थी असा एकाएकीं चालून आला आहे त्याअर्थी त्याला कोणातरी बलाढ्याचें साहाय्य असलें पाहिजे हें चतुर तारेनें ताडलें. कारण वालीच्या पराक्रमाची पूर्ण कल्पना सुग्रीवाला आहे, हें तिला माहीत होतें. त्यामुळें सुग्रीवाचें युद्धाचें आव्हान ऐकतांच वाली जेव्हां त्याच्याशीं लढण्यासाठीं जावयास निघाला तेव्हां तारेनें त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला. परंतु वाली ऐकेना तेव्हां ती काकुळतीला येऊन म्हणाली, "निदान मंत्र्यांचा सल्ला तरी घ्या." परंतु वालीला आपल्या शक्तीची फार घमेंड होती. त्यानें सांगितलें कीं, प्रत्यक्ष विष्णु जरी माझ्या शत्रूचा पाठीराखा म्हणून

येऊन उभा राहिला तरी तो युद्धांत माझ्यासमोर टिकणार नाहीं ! तरीसुद्धां तारेला त्याची खात्री वाटत नव्हती. परंतु तिनें जेव्हां वालीला अधिकाधिक आग्रह करून लढाईला न जाण्याबद्दल विनविलें तेव्हां मात्र वाली चिडला आणि त्यानें तिला तेथून घालवून दिलें.

ती बिचारी दुःखी कष्टी होऊन परत गेली आणि वाली सुग्रीवासमोर आला. "आज कांहीं माझ्या हातून तूं जिवंत सुटत नाहींस" असें ललकारून वालीनें त्याच्यावर झेप घेतली. रागानें त्याचे डोळे लालबुंद झाले होते. ओठ चावीत, मुठी वळीत आणि दांत करकरावीत तो सुग्रीवाशीं भिडला. सुग्रीवहि कांहीं कमी नव्हता. तो बेभान झाल्यामुळें वाली आपला वडील भाऊ आहे वगैरे सर्व विसरून गेला होता. तोहि तावातावानें वालीवर घसरला. परस्परांत भयंकर युद्ध चालू झालें. वाली खूपच शक्तिवान असल्यामुळें त्यानें सुग्रीवाला जमिनीवर लोळविलें. तें पाहून हनुमंताला काळजी वाटूं लागली. परंतु इतक्यांत रामानें सुग्रीवाला दिलेल्या वचनाप्रमाणें एकच बाण सोडून वालीला भयंकर जखमी करून खालीं पाडलें. वालीनें जरा सावध होऊन पाहिलें तों त्याला वर्मी लागलेला बाण रामाचा होता. त्यामुळें त्यानें रामाची निर्भर्त्सना करण्याच्या उद्देशानें म्हटलें, "तूं तर धर्मानें चालणारा,

असें असतांना युद्धांत तूं माझ्याशीं कपट केलेंस, हें तुला कितपत शोभतें ! वास्तविक लोकांचें दुःख निवारण करणारा तूं, या अधर्माची तुला लाज कशी वाटत नाहीं ? माझ्यावर कपटानें बाण टाकून तूं आपल्या कीर्तीला कलंक लावला आहेस ! राघवा, खरोखरी हा तुझ्या हातून अधर्मच घडलेला आहे. ”

“ दुसऱ्याच्या पत्नीचें अपहरण करणें हा अपराध केल्यामुळें तूं शिक्षेला पात्र आहेस; आणि शिक्षेला पात्र असणाऱ्याला शिक्षा करणें हा अधर्म होऊं शकत नाहीं, ” असें रामानें यावर उत्तर दिलें.

अखेर वालीनें म्हटलें, “ ठीक आहे. तूं मला शिक्षा दिलीस तेव्हां मी पापमुक्त झालों. ”

वालीची घटका भरत आली. त्याची ती केविलवाणी अवस्था नजरेला पडूं नये म्हणून बायकामाणसांना तेथून दूर करण्यांत आलें. वालीचा पुत्र अंगद पित्याच्या अखेरच्या भेटीसाठीं आला. त्याचें व सुग्रीव इत्यादिकांचें सांत्वन करून वालीनें अंगदाला सुग्रीवाच्या पदरांत घातलें. नंतर त्यानें राजघराण्याचें धन म्हणून असलेली सुवर्णमाला सुग्रीवाच्या गळ्यांत घातली. हनुमन्तानें पाणी आणलें त्यानें आचमन करून वालीनें प्राण सोडले.

तो वीरगतीला निघून गेला. त्याचे यथोचित अंत्य संस्कार करण्यास रामानें सुग्रीवाला सांगितलें.

आणि मग सुग्रीवाला राज्याभिषेक करण्याची तयारी सुरू झाली.

२ ...

सुग्रीवाला रामाच्या साहाय्यामुळें किष्किंधेचें राज्य परत मिळालें. आतां रामाचें कार्य सुग्रीवाला करावयाचें होतें. त्यानें सीतेचा शोध लावण्यासाठीं आपले वानरवीर दशदिशांना पाठविले. फक्त दक्षिण दिशेकडे गेलेल्या वानरांखेरीज इतर वानर हात हालवीतच परत आले. मात्र दक्षिणकडे गेलेल्यांनीं सुवार्ता आणली कीं, सीता-शोधासाठीं हनुमान समुद्र उल्लंघून लंकेंत गेला आहे.

सीतेला रावणानें पळवून लंकेंत आणल्याला पुष्कळ दिवस झाले होते. तिनें अन्नपाणी वर्ज्य केल्यामुळें ती दिवसानुदिवस खंगत चालली होती. तिला अशोकवनांत राक्षसींच्या पाहाऱ्यांत बंदोबस्तानें ठेवण्यांत आलें होतें. त्या ठिकाणीं राक्षसी टाकून, टोंचून बोलत तें तिला निमूटपणें ऐकून घ्यावें लागत होतें. प्रिय रामापासून ताटातूट होऊन तिला दूर राक्षसराज़ रावणाच्या राज-वाड्यांत येऊन पडावें लागलें होतें. अशा परिस्थितींत ती

स्वतःचाच धिक्कार करून म्हणत होती कीं, ' मला अजून मरण तरी कसें येत नाहीं!' खरें म्हणजे रामाच्या पराक्रमावर तिचा विश्वास होता. त्याच एका आधारावर ती तशा कठीण परिस्थितींतहि धीर धरून होती.

आज एकाएकीं तिच्या चित्तवृत्ति किंचित फुलल्या. रसरसलेल्या लोहाराच्या भट्टींत पाण्याचा शिडकाव व्हावा, तसें तिला वाटलें. तिनें कल्पना केली कीं, ' बहुधा आज माझ्या आठवणीनें रामाचें हृदय प्रसन्न होण्यासारखें कांहीं तरी घडलें असलें पाहिजे.'

तिची ती कल्पनाहि कांहीं खोटी नव्हती. तिच्या मनांत हा विचार उत्पन्न होत आहे तोंच रामानें दिलेली अंगठी बरोबर घेऊन त्याचा दूत हनुमान प्रत्यक्षच तेथें येऊन पोहोंचला. लंकेंत प्रवेश केल्यावर जेव्हां रावणाचा राजवाडा त्याच्या दृष्टीला पडला तेव्हां त्याची अप्रतिम रचना पाहून तो थक्कच होऊन गेला.

इंद्राच्या अमरावतीशीं स्पर्धा करणाऱ्या त्या नगरींत सोन्याचीं तोरणें झळाळत होतीं आणि हिरेमाणकांची प्रभा जागजागीं फांकली होती. तें सर्व वैभव पाहून हनुमंताच्या मनांत विचार आला-' अशी ही अलौकिक लक्ष्मी रावणाला प्राप्त झाली आहे खरी, पण वाईट मार्ग धरून तो ती नष्ट करायलाच सज्ज झालेला दिसतो. '

पण ही शोभा पाहण्यांत वेळ गमावण्यासाठीं कांहीं हनुमान तेथें आलेला नव्हता. त्याला शोधायची होती सीता. त्यासाठींच त्यानें इतक्या दूरवर येण्याचे कष्ट घेतले होतें. मारुतीनें अंत:पुरापासून स्नानगृहापर्यंत असें कोणतेंहि ठिकाण पाहाण्याचें शिल्लक ठेवलें नाहीं; परंतु तरीहि सीता त्याला कोठें आढळेना. तेव्हां उंचावरून त्यानें पुन्हां एकदां सर्व बाजूंना नजर टाकली तों प्रमदवन त्याला दिसलें. तो लगेच तेथें सीतेचा शोध लागतो का पाहावें म्हणून प्रमदवनांत गेला. तेथें पुष्कळ हिंडल्यावर राक्षसींनीं वेढलेली एक स्त्री त्याला दिसली. निळ्या मेघांच्यामध्यें वीज तळपतांना दिसावी तशी ती दिसत होती. काळ्या सापासारखी तिच्या पाठीवरील एकच वेणी हालत होती. खाणेंपिणें सोडून दिल्यामुळें तिचें शरीर अगदींच वाळून गेलें होतें. तिच्या डोळ्यांतून अश्रूंची सारखी धार लागली होती. सूर्याच्या प्रखर उन्हानें करपून चाललेल्या कमळवेली-प्रमाणें भासणारी ती स्त्री कोण असावी याचा तर्क मारुती करूं लागला. इतक्यांत रावणाची स्वारी तिकडेच येतांना त्याला दिसली. एकाद्या माजलेल्या हत्तीसारखा डुलत डुलत तो येत होता. त्याच्या नजरेला आपण पडूं नये म्हणून हनुमानानें चटकन एका अशोकवृक्षावर उडी टाकून त्याच्या ढोलींत जाऊन तो बसला. तेथून त्याला सर्व दिसत होतें.

रावणाचें बोलणें ऐकून हनुमानाची खात्री झाली कीं आपण पाहातों आहों हीच सीता. तो म्हणत होता, "काय करावें, ही तर कसल्याहि प्रकारच्या सुखसोयीला जवळ थारा देत नाहीं. मी, माझें सारें वैभव यांकडे तर ही ढुंकून पाहायलाहि तयार नाहीं. एका क्षुद्र माणसाकडेच हिचें चित्त लागलेलें असून मला वश होण्याचें हिचें लक्षण दिसत नाहीं." चतुर मारुतीनें तेव्हांच ताडलें कीं, मग हीच रामाची पत्नी मैथिली-सीता.

रावण अजीजीनें तिला म्हणत होता कीं, वनवासी रामाचा नाद सोडून देऊन तूं माझी हो. हा हट्ट सोड. परंतु सीता त्याला उत्तर सुद्धां देत नव्हती. रावणाचा तो उद्धटपणा पाहून हनुमानाला अशी चीड आली कीं रामाच्या अमोघ बाणानें मरावयाचा हा रावण आपणच येथें निकालांत काढावा. परंतु त्यामुळें कार्यहानि होईल या भयानें त्यानें स्वतःचा क्रोध आवरला. रावणानें अधिक लघळपणा करायला सुरुवात करतांच सीता संतापली आणि तिनें नुसतें म्हटलें, 'शापून टाकतें या दुष्टाला.' सीतेच्या पातिव्रत्याचा प्रभाव इतका विलक्षण होता कीं, देवदानवांनाहि लढाईंत जिंकणारा महापराक्रमी रावण पतिव्रतेच्या या नुसत्या वाणीनेंच विरमला. अधिक वेळ न थांबतां मग तो स्नानाच्या निमित्तानें तेथून निघून गेला.

लवकरच पहारेकरी राक्षसिणीहि घोरूं लागल्या. ही वेळ सीतेची भेट घ्यायला योग्य आहे असें पाहून हनुमान अशोकाच्या झाडावरून खालीं उतरला.

त्यानें सीतेपुढें येऊन सांगितलें कीं, मला रामानें आपल्याकडे धाडलें आहे. परंतु तिला विश्वास कसा पटावा! मायावी राक्षसांच्याच नगरांत ती राहात होती. हा कोणी मायावी राक्षस वानराचें रूप घेऊन आला नसेल कशावरून ? परंतु हनुमानानें रामाकडील सविस्तर हकीकत सांगून तिच्या मनांतील शंका काढून टाकली. तिच्या विरहामुळें रामाची अवस्था कशी विकल झालेली आहे तें वर्णन करून सांगितल्यावर मात्र सीतेचें अंतःकरण हेलावलें. नंतर मारुतीनें तिला आश्वासन देऊन म्हटलें कीं, " तुम्ही दुःख करूं नका. राम आपलें प्रचंड धनुष्य बरोबर घेऊन वानरसेनेसह लंकेवर लवकरच चालून येईल आणि या रावणाचा संहार करील. तुम्ही मुळींसुद्धां मनांत शंका बाळगूं नका. मी रामांना येथें घेऊन येतोंच. "

अखेर ' यशस्वी हो ' असा आशीर्वाद देऊन सीतेनें हनुमानाला निरोप दिला. परंतु हनुमानानें विचार केला कीं, आपण येथें येऊन गेल्याचें रावणाला समजल्याशिवाय काय उपयोग ? तशी कांहींतरी खूण आपण मागें ठेवलीच पाहिजे असें ठरवून त्या रामदूतानें रावणाचें सारें अशोकवन पार उध्वस्त करून टाकलें.

३ * * *

हनुमानानें अशोकवन उध्वस्त केल्याची बातमी शंकुकर्ण नांवाच्या राक्षस-सेवकानें भीतभीतच जाऊन रावणाच्या कानावर घातली. कारण रावणाची आवडती पट्टराणी मंदोदरीहि या बागेंत पानेंफुलें तोडण्यास धजत नसे. तिथल्या रोपटयांना तर कोणी कधीं हातहि लावावयाचा नाहीं, असा नियम होता. असें असतांना रावणाची ती सारी बागच हनुमानानें मोडून तोडून टाकली होती. त्यामुळें रावणाचा राग अनावर झाला. एका यःकश्चित वानरानें असलें हें धारिष्ट करावें याचें त्याला नवल वाटलें. त्यानें त्याला ताबडतोब पकडून आपल्यापुढें हजर करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें शंकुकर्ण गेला आणि तसाच रिकामा परत आला. कारण तें प्रकरण इतकें सामान्य नव्हतें कीं कोणाहि राक्षसानें जावें आणि त्याला धरून आणावें.

मारुतीनें अशोकवनांतले सालवृक्ष कमळाच्या वेली ओरबडून काढाव्यांत तितक्या लीलेनें समूळ उपटून टाकले होते. तेथें उभारलेले कृत्रिम डोंगर नुसत्या बुक्कीनेंच धुळीला मिळविलें होते. लतामांडवांची धुळधाण करायला तर त्याला स्वतःचे हातच पुरेसे झाले होते. तेथील बागेच्या राखणदारांना पळवून लावायला तर त्यानें नुसता भुभुःकार

केला तेवढ्यानेंच काम झालें. म्हणून शंकुकर्णानें हनुमानाला पकडून आणण्यासाठीं सैन्य मागितलें. बरोबर एक हजार किंकरांचें सैन्य घेऊन शंकुकर्ण गेला पण त्यानेंहि काम भागेना.

तेव्हां मग रावणाचा मुलगा अक्ष त्याला पकडण्यासाठीं गेला. रावणाचे पांच सेनापतीहि त्याच्याबरोबर त्याच्या मदतीला गेले. परंतु मारुतीनें त्या सर्वांनाहि यमसदनास पाठविलें. कुमार अक्षाला हनुमानानें ठार केलें हें समजतांच रावण चवताळून स्वतःच मारुतीच्या पारिपत्यासाठीं निघाला होता. परंतु तेवढ्यांत त्याचा दुसरा मुलगा इंद्रजित हनुमानावर चालून गेला. तो अस्त्रविद्या जाणणारा असल्यामुळें त्यानें मारुतीला अस्त्रानें पकडून रावणासमोर आणलें. वास्तविक इन्द्रजितालाहि मारुतीचा पराभव करून त्याला पकडून आणतां येण्यासारखें नव्हतें. तथापि 'पाहूं या तर खरें हा राक्षसराज रावण आहे तरी कसा तें' अशा कुतूहलानें त्यानें इन्द्रजिताच्या अस्त्रांत स्वतःला बांधून घेतलें.

रावणानें बिभीषणालाहि बोलावून घेतलें. बिभीषण तर सुरुवातीपासूनच आपल्या भावाला सांगत होता कीं, सीतेला आणलीस तशीच परत पाठवून दे, नाहींपेक्षां कुलक्षय ओढवेल. परंतु रावण त्याचें म्हणणें ऐकायलाहि

तयार नव्हता. त्यामुळें बिभीषण मनांतून खिन्नच होता.

हनुमानाला रावणापुढें आणून उभा करतांच रावणानें बिभीषणाला विचारलें कीं, अशोकवनांत उत्पात माजविणारें हेंच का तें माकड? तेव्हां बिभीषण म्हणाला कीं, तो याहूनहि कांहीं मोठ्या कामासाठीं येथें आलेला दिसतो. म्हणून मग रावणानेंच हनुमानाला तो कोण, त्याच्या लंकेंत येण्याचें कारण काय म्हणून विचारलें.

'मी अंजनीसुत, वायुपुत्र हनुमान असून, मला रामानें येथें पाठविलें' अशी आपली ओळख हनुमानानें करून दिली. त्यानें रामाचा निरोप म्हणून रावणाला सांगितला कीं, 'आतां तूं शंकराचा आश्रय केलास किंवा अगदीं खोल पाताळांत जाऊन दडलास तरी राम आपल्या बाणांनीं तुला यमसदन दाखविल्याशिवाय कदापि राहाणार नाहींत.' हनुमानाचें हें बोलणें ऐकतांच रावण तिरस्कारानें हंसला आणि म्हणाला कीं, "अरे देव-दानवांनाहि ज्यानें आपल्या अस्त्रांनीं जिंकलें त्याला तुझा मानवी राम लढाईचें आव्हान देतो हें किती हास्यास्पद!" त्यावर मारुतीनें त्याला अचूक टोमणा मारला कीं, "मग तूं एवढा शूर असतांना रामाची पत्नी कपटानें कां पळवून आणलीस?" बिभीषणानेंहि मारुतीच्या या म्हणण्याला दुजोरा दिला. तेव्हां रावण संतापला आणि त्यानें हनुमानाच्या शेपटीला आग लावून

त्याला हांकून देण्याची आज्ञा केली. जातां जातां त्यानें त्याच्याबरोबर रामाला उलट निरोप पाठविला कीं, ' तुझी पत्नी मीं पळवून आणली तेव्हांच वास्तविक तुझा मी पराभव केलेला आहे. परंतु अजून जर तुला तुझ्या धनुर्धारीपणाचा अभिमान असेल तर मी तुझ्याशीं लढायला केव्हांहि तयार आहें.' हनुमानानेंहि त्याला बजावलें कीं, तुझी ही इच्छा लवकरच सफळ होईल! वानरवीरांचा लंकेला वेढा पडून ही सारी नगरी तिच्या तटाबुरुजांसह उध्वस्त झालेली तू लवकरच पाहशील. आणि रामानें केलेल्या धनुष्याच्या टणत्कारानेंच तुझा विनाश ओढवलेला तुला दिसेल.

राक्षस हनुमानाला तेथून घेऊन गेल्यावर रावणाला दोन हिताचे शब्द सांगण्याचा प्रयत्न बिभीषणानें केला. परंतु रावण त्याच्याकडे लक्ष द्यावयासहि तयार नव्हता. सीताहरणामुळें साऱ्या राक्षसकुळाचा विनाश होईल, असें बिभीषणानें त्याला बजावलें; आणि अखेर असेंहि सांगितलें कीं, जर तूं हें माझें म्हणणें ऐकणार नाहींस, तर आपसांतच भयंकर वैर माजेल. तेव्हां मात्र रावणाला तें सहन करणें अशक्य झालें. तो म्हणाला, " शत्रुपक्षाला जाऊन मिळालेला हा नीच यापुढें क्षणभरहि माझ्या दृष्टीसमोर नको ! " आणि असें म्हणून त्यानें बिभीषणाला लंकेंतून हद्दपार करण्याची आज्ञा दिली. परंतु बिभीषण म्हणाला,

" एवढें कशाला ? मीच आपण होऊन निघून जातों म्हणजे झालें. तूं घालवून देत आहेस, त्याअर्थी ही राजाज्ञा म्हणून मी पाळतों. पण आतां याचा दोष मात्र मजकडे नाहीं. तुझें प्रेमहि नको नि रागहि नको. तुझ्या इच्छेला येईल तसा तूं वाग. "

बिभीषण समजून चुकला होता कीं, रामाच्या हातून सारें राक्षसकुळ नष्ट होऊन जाणार आहे. तेव्हां निदान स्वत:चा तरी उद्धार करून घ्यावा म्हणून तो शरणागतांचें रक्षण करणाऱ्या रामाच्या आश्रयाला निघून गेला. आणि आतां बिभीषणहि निघून गेला तेव्हां आपण एकटचानेंच काय तें केलें पाहिजे असें ठरवून रावण स्वत: लंका नगरीच्या संरक्षणाच्या तयारीला लागला.

४ * * *

सीतेचा शोध लावून हनुमान लंकेहून परत आला. लंकेवर स्वारी करण्याचें ठरलें. रामाच्या साहाय्यासाटीं सुग्रीवाची वानरसेना सज्ज झाली आणि लगेच दक्षिणेच्या सागरकिनाऱ्याची वाट चालूंहि लागली. दुर्लंघ्य पर्वत, मोठमोठचा नद्या व निबिड अरण्यें ओलांडीत ही वानरवीरांची सेना राम-लक्ष्मणासह सागरकिनाऱ्यावर येऊन थडकली.

शत्रूचा समाचार घेण्यासाठीं धनुष्य सज्ज करूनच राम तेथवर येऊन पोहोंचला होता. परंतु समोर पसरलेला दुस्तर सागर पाहून मात्र त्याला वाटलें कीं हा आपल्या शत्रूला पाठीशीं घालून उभा राहिला कीं काय ! परंतु त्याची ही अडचण निवारणारी व्यक्ति आपण होऊनच त्याच्याकडे चालून येत होती.

अरुणोदयाची शोभा पाहात राम-लक्ष्मण सुग्रीव-हनुमानासह सागरतटाकीं उभे असतांनाच आकाशांत एका राक्षसाची आकृति दिसूं लागली. पाण्यानें ओथंबलेल्या ढगांसारखी त्याची कांती होती. त्यानें आपल्या अंगावर घातलेले सोन्याचे अलंकार चमचम करीत होते. परंतु हा राक्षस रामाच्या सैन्याकडे कशासाठीं येत होता त्याची कांहीं कल्पना येईना. आगींत शिरूं पाहाणाऱ्या टोळा-प्रमाणेंच तो सुग्रीवाला वाटला.

हनुमानानेंहि ती राक्षसाची आकृति पाहून वानरवीरांना सावध राहाण्याचा इषारा दिला. तो खालीं येतांच त्याला काय हातीं लागेल त्या साधनानें ठार मारण्याची सूचना हनुमानानें त्यांना दिली. त्याला वाटलें कीं हा राक्षस रामाच्या जिवावरच उठला आहे; म्हणून त्यानें सर्वांना तशी सक्त ताकीद दिली.

परंतु रामानें त्याला म्हटलें कीं, “अरे, राक्षस आला

म्हणून उगीच धांवपळ करूं नकोस." इतक्यांत तो राक्षस जवळ येऊन पोहोंचल्यानें हनुमानानें त्याला ओळखलें व तो ओरडला "हा तर बिभीषण !"

रावणानें आपल्या राज्यांतून हांकून दिलेला बिभीषणच होता तो. तो रामाच्या आश्रयाला आला होता. पण गंमत अशी होती कीं, वास्तविक तो शत्रुपक्षांतील असल्यामुळें त्याचें रामाच्या शिबिरापाशीं येणें संशयाला कारण होणारें होतें. आणि तो कांहीं दूत म्हणूनहि आलेला नव्हता; त्यामुळें त्याच्या रक्षणाची जोखीम रामावर नव्हती. परंतु त्याचा रामाच्या सौजन्यावर विश्वास होता. आपण शुद्ध मनानें त्याच्याकडे चाललों आहोंत तेव्हां आश्रयाला आलेल्यासंबंधीं प्रेम बाळगणारा राम आपल्यासंबंधीं वेडी-वांकडी शंका घेणार नाहीं, असें त्यानें मनाशीं ठरविलें. आपण आल्याची वर्दी रामाकडे कशी पोहोंचवावी या विचारांत असतांनाच त्याच्या ओळखीचा हनुमान त्याला तेथें दिसला. तेव्हां त्यानें हनुमानाला हांक मारून त्यालाच ती कामगिरी सांगितली.

हनुमानानेंहि 'धर्मात्मा' म्हणून त्याचा गौरव करून रामापाशीं जाऊन सांगितलें कीं, "तुमच्यासाठींच त्याला स्वदेशाला मुकावें लागलें आहे आणि तो तुमच्याच आश्र-याला आतां आलेला आहे."

रामानेंहि तें ऐकतांच लक्ष्मणाला त्याला सन्मानानें घेऊन येण्यास सांगितलें. परंतु सुग्रीवाला मात्र अद्यापि बिभीषणाच्या हेतूविषयीं खात्री नव्हती. त्याच्या चेहेऱ्यावर तशी शंका दिसल्यामुळें रामानें त्याला विचारलेंहि. तेव्हां सुग्रीव सूचनावजा बोलला कीं, या राक्षसांचा कांहीं नेम नाहीं. हे राक्षस मोठे मायावी नि मोठे कपटी योद्धे असतात. तेव्हां जरा विचार करूनच बिभीषणाला येथवर येऊं द्यावें.परंतु मारुतीनें त्याला समक्षच रावणाशीं भांडतांना पाहिलेलें होतें. त्यामुळें त्यानें बिभीषणासंबंधीं खात्री देऊन म्हटलें कीं, आपण जसे रामाचे भक्त तसाच हा बिभीषणहि समजा.

मग लक्ष्मण बिभीषणाला घेऊन आला. रामानें त्याचें क्षेमकुशल विचारलें. बिभीषणानेंहि आदरपूर्वक उत्तर दिलें कीं, "तुमच्या चरणांचा आश्रय लाभला, आतां मात्र खरोखरीच मी सुखरूप झालों." रामानें त्यावर लगेच त्याला आश्वासन दिलें कीं "यापुढें तूं लंकेचा राजा झालास, असें मीं तुला वचन देतों." अर्थातच रामाची आपल्यावर ही फारच मोठी कृपा झाली असें मानून बिभीषणहि आनंदित झाला. बिभीषणासारखी शत्रुपक्षांतील एक अति महत्त्वाची व्यक्ति रामाला येऊन मिळाल्यामुळें रामाचें काम झाल्यासारखेंच होतें. तथापि लंकेवर स्वारी करण्यासाठीं दुस्तर सागर कसा ओलांडून

जावयाचें हा मात्र मोठा प्रश्न रामाच्या सेनेपुढें अद्यापि होता. बिभीषणानें त्यावर तोड सुचविली कीं, समुद्र मार्ग देत नसेल तर दिव्य अस्त्राचा प्रभाव त्याला दाखवा. रामाला ही कल्पना एकदम पसंत पडली.

रामानें लगेच धनुष्य सज्ज करून रागानें म्हटलें कीं, माझ्या बाणाच्या सामर्थ्यानें समुद्राचें हें सारें पाणीच आतां मी आटवून टाकतों. सागरानें मला वाट करून दिली नाहीं तर त्याच्या लाटांचें हें तांडव मी कायमचेंच नाहींसें करून टाकतों. रामाचा तो रौद्रावतार पाहून भगवान अरुण समुद्राच्या पोटांतून तत्काळ प्रकट होऊन रामाला शरण आला. हा मानवाचा देह धारण केलेला प्रत्यक्ष नारायणच असें समजून वरुणानें रामाला वंदन केलें. उलट रामानेंहि त्याला नमस्कार केला. तेव्हां वरुणानें विचारलें, "महाराज, आपण एवढा राग आमच्यावर कशासाठीं केलात? आम्हीं आपलें कोणतें काम करावें अशी आपली इच्छा आहे?"

रामानें अर्थातच त्याला लंकेला जाण्याकरितां मार्ग करून देण्यास सांगितलें. वरुणानें लगेच त्या मागणीला होकार दिला व तो अदृश्य झाला. हळुहळु समुद्र शांत होऊं लागला. त्याच्या लाटांचा आवाज बंद पडला. आणि समुद्राचें पाणी दुभंग होऊन त्यांतून वाट दिसूं लागली.

लगेच रामाच्या आज्ञेवरून हनुमान पुढें झाला व वानरसेना लंकेवर स्वारी करून निघाली.

थोडयाच वेळांत समोर लंकानगरी दिसू लागली. राक्षसांच्या नगरीचें वैभव दुरूनहि लक्षांत येत होतें. तें पाहून राम विषादानें म्हणाला, " लवकरच हें सारें वैभव धुळीला मिळणार आहे ! कर्णधाराच्या दोषामुळें जशी नौका समुद्रांत बुडावी तसा हा रावण स्वत:च्याच चुकीच्या वागण्यानें या लंकेचा विनाश ओढवून घेत आहे. "

सुवेळ पर्वतावर रामाच्या सैन्याचा तळ पडला. नीलानें सेनापति या नात्यानें सर्व सैनिकांची तपासणी केली. तेव्हां त्याला कोणीतरी दोन परके वानर त्यांत आढळले. म्हणून त्यांना नीलानें रामासमोर आणून उभें केलें. ते बतावणी करीत होते कीं आपण आर्य कुमुदाचे शिपाई आहोंत. पण त्यांना समोर पाहातांच बिभीषणानें लगेच ओळखलें व सांगितलें कीं हें खरे वानर नसून रावणाचे हेर शुक व सारण वेष पालटून आलेले आहेत. आपलें बिंग बाहेर पडलेलें पाहून त्या दोघांनीं मग असें सांगायला सुरुवात केली कीं, रावणाच्या अपराधामुळें सारें राक्षस-कुल नष्ट होऊन जाणार हें आम्हांला दिसत आहे. म्हणून निराश्रित होण्याच्या भीतीनें आम्ही अगोदरच रामाच्या

आश्रयाला आलों आहोंत. परंतु बिभीषण रावणाच्या दरबारांतील सर्व रहस्यें जाणणारा असल्यामुळें त्यानें रामाला तत्काळ सांगून टाकलें कीं, " रावणाच्या खास विश्वासांतले हे त्याचे मंत्री आहेत. प्राणावर बेतलें तरी हे आपल्या धन्याला सोडणार नाहींत. तेव्हां यांना योग्य ती शिक्षा दिलीच पाहिजे. " अर्थातच शुक-सारणांच्या शब्दावर विश्वासून त्यांना रामाच्या सैन्यांत आश्रय मिळणें आतां शक्य नव्हतें. परंतु त्यांना शिक्षा करण्याची सूचना मात्र रामानें मान्य केली नाहीं. या हेरांना शिक्षा करून आपला कांहीं लाभ नाहीं कीं रावणाचीहि कांहीं विशेष हानि नाहीं. तेव्हां यांना सोडून द्यावें असें त्यानें सांगितलें. मात्र त्यानें त्या दोघांबरोबर रावणाला निक्षून निरोप पाठविला कीं, " माझी धर्मपत्नी तूं पळवून आणलीस, त्यामुळें मला तुझ्याशीं वैर करावें लागलें आहे. मी येथें जो आलों आहें तो तुझा रणांगणावरचा अतिथी म्हणून; तेव्हां आतां तेथेंच आपली गांठ पडेल. "

५ ⚜⚜⚜

लंकेच्या रणक्षेत्रावर राक्षसांचा भयंकर संहार सुरू झाला. राक्षसांकडील मोठमोठे वीर कामीं आले. सर्व प्रकारच्या साधनसाहित्याची फार मोठी हानि झाली. राक्षसांच्या वैभवाला उतरती कळा लागली. एवढेंच नव्हे

तर स्वतः रावणाचे स्वतःचे तरी प्राण वांचतात कीं नाहीं अशी शंका उत्पन्न झाली. तरीसुद्धां हट्टी रावणाच्या बुद्धीला कांहीं अद्यापि शहाणपण सुचत नव्हतें. रामाची पत्नी पळवून आणल्यामुळें तो समुद्रासारखा भयंकर खवळला होता. त्याला त्याची पत्नी परत करून शांत करावें असें अजूनहि रावणाच्या मनांत येत नव्हतें.

प्रहस्तासारखे रणधुरंधर आणि बिभीषण-इन्द्रजितासारखे प्रमुख आप्त-स्वकीयहि रामाच्या बाणांना बळी पडले. पण अजूनहि रावणाची कामवासना शांत होत नव्हती. त्याला आपल्या मंत्र्यांचा सल्ला रुचत नव्हता. आणि तो सीतेला परत करण्यास तयार नव्हता. त्याची लढाईची खुमखुमी अद्यापि जिरली नव्हती. आणि त्यांतच त्यानें सीतेशीं कपट करण्याचाहि डाव टाकलेला होता.

पण राज्यलक्ष्मी आतां रावणाला कंटाळली होती. लंकादेवतेच्या रूपानें ती रावणाला सोडून रामाकडे निघाली होती. तें पाहूनहि रावणाचे डोळे उघडले नाहींत. उलट तो उद्धटपणानें म्हणाला, " तुला कुबेराला जिंकून माझ्या स्वाधीन करून घेतली तशीच आतां रामाला रणांत ठार मारून तुला मी आपल्याकडे परत आणल्याशिवाय राहाणार नाहीं !" परंतु रावणाची ही प्रौढी खोटी होती, याचें प्रत्यंतर त्याला लवकरच यावयाचें होतें.

रामाचा तर आपण पराभव करूंच. पण सीताहि आपल्याला मिळाली पाहिजे, असा त्याचा हट्ट होता. म्हणून त्यानें एक कपटनाटक रचलें. त्या नाटकाचीं सगळी तयारी करून तो अशोकवनांत सीतेकडे निघाला.

वास्तविक राम आपल्या मुक्ततेसाठीं आल्याचें समजल्यापासून तिचें मन उल्हसित झालें होतें. परंतु त्या दिवशीं अकस्मात तिला उदासीन वाटूं लागलें. अपशकुनहि होऊं लागले. म्हणून अस्वस्थ होऊन ती विचार करूं लागली कीं 'असें कां बरें होत आहे ?'

इतक्यांत रावणाची स्वारी तिच्या पुढयांत येऊन उभी राहिली. तो म्हणूं लागला कीं, त्या मानवाला—रामाला आपल्या मनांतून काढून टाक. मी लक्ष्मणासह त्याला आजच युद्धांत ठार मारणार आहें. परंतु सीतेनें त्याचा धिक्कार करून इतकेंच उत्तर दिलें कीं, "तूं हातानें मंदार पर्वत उचलूं पाहाणारा मूर्खच दिसतोस !" परंतु तेवढयांत राम-लक्ष्मणांच्या हुबेहुब तोंडावळयाचीं दोन तोडलेलीं शिरें एका राक्षसानें रावणापुढें आणून ठेवलीं व त्यानें सांगितलें कीं, कुमार इन्द्रजितानें राम-लक्ष्मणांचा वध करून त्यांचीं हीं शिरें आपल्याकडे पाठविलीं आहेत. लगेच रावणानें त्या धडविरहित शिरांकडे बोट करून

सीतेला म्हटलें, "बघ, बघ, तुझ्या माणसांचीं हीं मुंडकीं!" तीं पाहून मात्र सीता अगदीं खचून गेली.

राम-लक्ष्मणांच्या तोंडावळ्यासारखीं दिसणारीं तीं शिरें पाहून सीतेची क्षणभर शुद्धच गेली. परंतु थोड्या वेळानें शुद्धीवर येतांच तिच्या मनांत शंका आली कीं, हेंहि रावणाचें कपट तर नसेल?

मग ती रावणाला आवेशानें म्हणाली, "ज्या तलवारीनें तूं त्यांना नष्ट केलेंस त्याच तलवारीनें माझाहि प्राण घेऊन टाक!"

परंतु रावण तिला समजावीत म्हणाला कीं, "राम आपल्या भावासह मारला गेला. आतां तुझी सुटका कोणाकडून होणार?" तितक्यांत रणांगणावरून बातमी घेऊन आलेला एक राक्षस लांबूनच ओरडत आला, "रामाकडून, रामाकडून–" तो राक्षस पुढें येतांच रावणानें त्याला रागानें विचारलें, "अरे, रामाकडून, रामाकडून काय ओरडतोस? त्याच्याकडून काय घडलें तें सांग लवकर." तेव्हां त्या राक्षसानें धांपा टाकीत सांगितलें कीं, "रामाकडून आपला पुत्र इंद्रजित याचा वध झाला." ती गोष्ट प्रथम रावणाला खरीच वाटेना, परंतु राक्षसानें खात्री पटवितांच रावण मूर्च्छित होऊन पडला.

सर्वनाश जवळ येऊन ठेपला आहे हें आतां त्याच्याहि लक्षांत आलें. आणि त्याला कारण ही सीता हेंहि त्याला पटलें. तेव्हां त्यानें ती सीता व राजलक्ष्मी यांचीहि आशा सोडली. रावणाला आपलें दुःख हृदयांत सामावणें कठिण झालें. प्रहस्त, इंद्रजितादि योद्धे ठार झाल्यामुळें त्याचें सैन्यहि लढाईंतून पळ काढूं लागलें. देवाबरोबर लढायचें व विजय हिसकावून आणायचा ही ज्यांची नेहमींची रीत ते या मानवाशीं चाललेल्या युद्धांतून भिऊन पळूं लागावेत आणि तेहि वीस हात असलेला रावण जिवंत असतांना हें राक्षसांचें दैव उलटल्याचेंच चिन्ह होतें ! रावणाला तशीच बुद्धि होत होती. त्यामुळें विजयी राम लंकेवर चालून येत असल्याचें पाहून रावण तलवार उपसून तसाच त्याच्याशीं लढावयास जाण्यासाठीं धांवूं लागला. जवळच्या राक्षसांनीं त्याला आवरलें. तेव्हां समोरच दिसणाऱ्या सीतेला पाहून तो म्हणूं लागला, "आतां हिचेंच काळीज तोडून, अंगावर हिच्या आंतड्यांचेच अलंकार चढवून त्या राम-लक्ष्मणांनाहि ठार मारतों आणि त्याबरोबरच या साऱ्या राक्षसकुळाचीहि इतिश्री करून टाकतों !"

परंतु हें निकरावर आल्याचें बोलणेंहि व्यर्थ होतें. हळुहळु तो भानावर आला व रथ आणवून युद्धावर जाण्यासाठीं निघाला. तरीहि जातां जातां त्यानें रामाला

२०९७७

आजच आपण नाहींसा करणार अशा वल्गना केल्याच. तेव्हां सीतेनें प्रतिज्ञा केली कीं, हे ईश्वरा ! आजवर आमच्या कुळाला योग्य अशाच प्रकारें जर मी रामाशीं वागलेली असेन तर रामाला आज युद्धांत विजय मिळालाच पाहिजे !

६ * * *

राम-रावणांचें घनघोर युद्ध सुरू झालें. देव, ऋषि, सिद्ध, गंधर्व यांनीं तें युद्ध पाहाण्यासाठीं आकाशांत गर्दी केली. सारी रणभूमी राक्षसांच्या प्रेतांनीं भरून गेली. वानरसैन्याच्या लाटांच्या लाटा उसळत होत्या. मगरीसारख्या तलवारी तळपत होत्या. रामरूपी चंद्राच्या बाणरूपी किरणांनीं उसळणारा तो रणसमुद्रच जणुं दिसत होता. तें सारेंच दृश्य मोठें भीषण होतें. रामचंद्राला पाहून रावण-राहू संतापला. देवसेनापति स्कंदाप्रमाणें भासणारा राम समोर रथांत दिसणाऱ्या रावणाकडे रोखून पाहूं लागला.

रावणानें टाकलेल्या कालांतकाप्रमाणें भयंकर अशा शक्तीचे रामानें हंसत हंसत मध्येंच तुकडे करून टाकले. तेव्हां रावण अधिकच चिडून रामावर बाणांचा पाऊस पाडूं लागला. रावण रथांतून लढत होता पण रामानें पायींच युद्ध चालविलें होतें. तें पाहून इंद्रानें आपला

तेजस्वी रथ मातलीबरोबर रामाकडे पाठवून दिला. राम मातलीच्या विनंतीप्रमाणें त्या रथांत बसून लढूं लागला. उभयतांचा तो विलक्षण युद्धप्रसंग पाहून सारे लढवय्ये जागच्या जागीं स्तब्ध झाले. दोन सूर्य एकमेकांना टकरा देताहेत असें दिसूं लागलें.

अखेर रामानें ब्रह्मास्त्राचें स्मरण केलें. स्मरण केल्याबरोबर तें सूर्यासारखें तेजस्वी धारेचें अस्त्र रामाजवळ येऊन पोहोंचलें. आणि क्षणार्धांतच रामानें तें रावणावर फेंकून त्याला ठार केला. रावण खालीं कोसळला.

देवशत्रु रावणाचा संहार झाल्याचें पाहातांच रामावर आकाशांतून पुष्पवृष्टि सुरू झाली. भेरी वाजूं लागल्या. रामाचा गौरव करण्यासाठीं विद्याधरांची गर्दी सुरू झाली.

रावणराज्य संपवून रामानें बिभीषणाला लंकेच्या राज्यावर बसविलें. आपण आपल्या सत्त्वाला जागून केलेल्या प्रतिज्ञेचा महासागर उल्लंघिला म्हणून रामालाहि कृतकृत्यता वाटूं लागली. लक्ष्मणानें येऊन सीतादेवी भेटीला येत असल्याचें रामाला सांगितलें. परंतु अनपेक्षितपणानें रामानें तिला नकार दिला. शत्रूच्या घरांत फार दिवस राहिली असल्यामुळें सीतेचा स्वीकार करण्यास आपलें मन घेत नाहीं, असें त्यानें लक्ष्मणाला सांगितलें.

अनुक्रम 20.5.67
विभाग
021


बिभीषणानेंहि सीतेचा सत्कारपूर्वक स्वीकार करण्या- विषयीं विनंती केली. परंतु रामानें तीहि मानली नाहीं. लक्ष्मण बुचकळयांत पडला. हनुमान आला त्याचीहि मती चालेना. लक्ष्मण खिन्न होऊन तेथून निघून गेला. परंतु थोडयाच वेळांत परत येऊन त्यानें रामाला एक आश्चर्य- कारक हकीकत सांगितली.

आपल्या पतीनें आपल्या शुद्धतेविषयीं शंका घेतल्याचें ऐकूनच त्या स्वाभिमानी सतीनें अग्निप्रवेश करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें तिनें अग्नींत उडीहि टाकली. परंतु साक्षात् अग्निनारायणानें प्रकट होऊन तिला रामाच्या हातीं निरविली आणि सांगितलें कीं, ही निष्पाप, पूर्ण शुद्ध आहे, हिचा स्वीकार कर. अग्नि असेंहि म्हणाला कीं, ही साक्षात् लक्ष्मीच मानवी देह घेऊन तुझ्या सहवासा- साठी आलेली आहे हें लक्षांत घे. तेव्हां मात्र मग रामानें कबूल केलें कीं सीता शुद्धच आहे हें मलाहि माहीत होतें, परंतु लोकांची खात्री होण्यासाठींच केवळ मला असें कठोर वागावें लागलें.

नंतर देवांनीं दशरथाच्या सांगण्यावरून रामाला अभि- षेक केला. इन्द्रानें भरतशत्रुघ्नांसह अयोध्येच्या प्रजाजनां- नाहि तेथें आणण्याची व्यवस्था केली. आणि राम सीतेसह कृतकृत्य होऊन राज्यावर बसले.

५४३९

## पहिली अखंड भरारी (The Spirit of St. Louis)

अनु. : शं. ल. चिटणीस — चार्ल्स लिंडबर्ग

न्यूयॉर्क ते पॅरिस अखंड विमान-भरारीची ती रोमांचकारी सत्यकथा स्वतः वैमानिकच सांगत आहे. रु. १–८–०

## अणूची कथा (Report on the Atom)

अनु. : प्रा. एम. पी. जंगी — गॉर्डन इव्हॅन्स डीन

अणुयुगाच्या पहिल्या दहा वर्षांचा हा आढावा सामान्य माणसालाहि अणूचें यथार्थ-दर्शन घडवील. रु. १–८–०

## महान परिवर्तन (The Big Change)

अनु. : शं. ल. चिटणीस — फ्रेड्रीक ल्युइस ॲलन

अमेरिकेच्या जीवनांत केवढें हें विलक्षण स्थित्यंतर चालू शतकाच्या पूर्वार्धांत घडून आलें आहे ! रु. १–८–०

## ॲब्राहम लिंकन (Abraham Lincoln)

अनु. : गोपाळराव कुलकर्णी — एमिल लुड्विग

मुक्त झालेल्या गुलामांच्या डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रु उभे राहिले. त्यासाठींच लिंकन जगला व हुतात्मा झाला. रु. १–८–०

## वादळ (Storm)

अनु. : प्रा. य. ग. नाईक — जॉर्ज स्टुअर्ट

ही आकर्षक हकीकत एका काल्पनिक वादळाची खरी पण कादंबरीइतकीच चटकदार ! रु. १–८–०

वोरा ॲन्ड कं., पब्लिशर्स, प्रायव्हेट लि., मुंबई २.

IRBK-0105439

IRBK-0105439